# प्रारुप

## राष्ट्रीय आरोग्य अभियान
## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी
## जिल्हा परिषद,गोंदिया

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांसाठी जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने/करार तत्वावर रिक्त असलेल्या खालील पदासाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr. No. | Name of Post | No. of Post | Category | Qualification | Experience | Salary per month |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Audiologist | 01 | SC - 01 | Degree in Audiology | 2 years' Experience | 25000 |
| 2 | Optometrist | 01 | OPEN - 01 | Bachelor in Optometrist with 1 Year Experience Or Master in Optometry from any recognized university | 1 years' Experience | 20000 |
| 3 | Staff Nurse | 09 | VJ-A-01<br>EWS – 04<br>NT-B – 01<br>NT –D -03 | GNM / B.Sc. (Nursing) Maharashtra Nursing Council Registration | NIL | 20000 |
| 4 | Lab Technician | 03 | SC-02,<br>VJ-A-01 | 12th + Diploma | NIL | 17000 |
| 5 | Medical Officer - Dental (DEIC) | 01 | VJ – A - 01 | BDS Or MDS any university recognized by dental Council of India | At least 2 years of working experience in a hospital/institution setup | 30000 |
| 6 | District Consultant – NTCP | 01 | VJ-A - 01 | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health | NIL | 35000 |
| 7 | Cold Chain Technicians | 01 | VJ-A - 01 | शैक्षणीक अर्हता:- माध्यमीक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी उत्तीर्ण)<br><br>तंत्रिक अर्हता :- महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे यांत्रीकी/विद्युत अभियांत्रिकी शाखेतील ३ वर्षीय पदवीका उत्तीर्ण किंवा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षण व वातानुकुलीकरण २ वर्षाचा ट्रेड उत्तीर्ण आणि एन.सी.टी.व्ही.टी. | पदवीकासाठी किमान २ वर्षाचा अनुभव आय.टी.आय.साठी किमान ३ वर्षाचा अनुभव | 17000 |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रमाणपत्र धारक असावा.<br>• एम.एस.सी.आय.टी.प्रमाणपत्र आवश्यक<br>• चारचाकी वाहन चालवण्याचा परवाना असल्यास प्राधान्य | | |
| 8 | Case Registry Assistant Program Assistant/Record Keeper | 02 | ST-01, VJ-A-01 | Any Graduate with MSCIT/ Typing Marathi 30 speed/English- 40 speed | Nil | 18000 |
| | Total | 19 | | | | |

## सर्वसाधारण अटी व शर्ती

१) फक्त Online पध्दतीनेच अर्ज स्वीकारण्यात येतील. Online पध्दतीने अर्ज भरणेकरीता www.zpgondia.gov.in या सकेंतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) सदर अर्ज भरणेकरीता उमेदवाराने स्वतःचा Gmail Account तयार करुन घेणे आवश्यक राहील.

३) Online अर्ज भरण्याचा कालावधी दि.03/07/2024 (सकाळी १०.३० वाजता पासून ते 17/07/2024. (सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) राहील.

४) प्राप्त अर्जाची यादी प्रकाशीत करणे (गुणाकंणासह) दि.23/07/2024 सकाळी ११.०० वाजता.

५) आक्षेप मागविण्याचा कालावधी दिनांक 25/07/2024 सायंकाळी ६.०० वाजे पर्यंत.

६) आक्षेप निराकरण करण्याकरिताचा कालावधी दिनांक 04/08/2024

७) अंतीम यादी प्रकाशीत करण्याचा दिनांक 12/08/2024

८) गरजेपक्षा जास्त उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास मेरीट लीस्ट नुसार १:३ उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करीता बोलाविण्यासाठी पदनिहाय वेळापत्रक वेबसाईटवर नंतर प्रकाशीत करण्यात येईल. इतर उमेदवारांना विचारात घेण्यात येणार नाही तथापी प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची यादी ही जिल्हा परिषद च्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात येईल.

९) पदनिहाय १:३ उमेदवारांच्या अर्जासोवत जोडलेल्या कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रकाशीत करण्यात येईल.

१०) अंतिम निवड यादी प्रसिध्द केल्यानंतर दुसऱ्या दिवशी नियुक्ती आदेश देण्यात येईल.

११) Online प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करतांना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव यावावींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येऊन सदर मेरीट लीस्ट ही जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात येईल व संबंधीत पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येईल.

१२) वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून त्याचा कालावधी हा दि. २९ जुन २०२४ पर्यंत आहे. हा कालावधी मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, रा.आ.अ.,मुंवई यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार व १५ वा वित्त आयोग पुढे सुरु राहील्यास पुर्ननियुक्ती व्दारे वाढविण्याची कार्यवाही केली जाईल.

Scanned with OKEN Scanner

१३)वरील नमुद सर्व पदे हि राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही.

१४)वरील सर्व पदांचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

१५)सदर पदांसाठी सेवा प्रवेशाची (जाहिरातीच्या दिवशी) कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे तसेच या पदासाठी सेवा समाप्ती मर्यादा ६० वर्षे राहील. उक्त नमुद पदावर राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षे पर्यंत क्षिथील राहील.

१६)उमेदवारांस एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज सादर करावयाचे असल्यास प्रत्येक पदांकरीता स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

१७)अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१८)अनुभव असलेल्या उमेदवारास निवड प्रक्रियेमध्ये प्राधान्य दिले जाईल. कामाचा अनुभव हा **आरोग्य विभागातील** शासकीय / राष्ट्रीय आरोग्य अभियान / स्थानिक स्वराज्य संस्थाचाच ग्राहय धरण्यात येईल. उमेदवार यांनी शासकीय संस्थेत स्व इच्छेने विना मानधन वर काम केल्याचा अनुभव ग्राहय धरण्यात येणार नाही.

१९)उमेदवाराने Online form सोबत जोडण्यात आलेले दस्ताऐवज स्वीकारण्यात येतील. नंतर कोणतेही दस्ताऐवज Offline मार्फत स्वीकारण्यात येणार नाही.

२०)मा.सर्वोच्च न्यायालयाने अपिल क्रं.७७४४/१९९७ या प्रकरणी दिनांक १८/०२/२००३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार मुळ नियुक्ती विहित मार्गाने केलेले असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. तसेच लोकसेवा आयोगाचे कक्षेतील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात नियुक्ती केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्ष सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क सांगु शकत नाही. सदरील नियुक्त्या या अत्यंत तातडीची गरज म्हणून असून विहित वेळेनंतर संपुष्टात येईल. तसेच अशा कर्मचाऱ्यांनी त्यांना नियमित सामावुन घेण्याची मागणी केली असेल तर मान्य करता येणार नाही.

२१)सदर प्रक्रियेत कोणत्याही क्षणी कोणतीही पूर्व सूचना / कारण न देता कोणत्याही टप्प्यावर बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे. सदर करिता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

२२)मुलाखत होणार नसल्याने तसेच संपूर्ण प्रक्रिया ही Online पध्दतीने राबविण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात बोलाविल्या शिवाय प्रत्यक्ष भेट देऊ नये.

२३)भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तत्रांचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल.

२४)अर्जासोबत अराखीव प्रवर्गासाठी रु.२००/- आणि राखीव प्रवर्गासाठी रु.१००/- ची District Integrated Health & Family Welfare Society, Gondia बॅंक ऑफ बरोडा खाते क्रं. 59070100009003 IFSC Code BARB0GORELA मध्ये जमा करावे व याची जमा पवाती

Scanned with OKEN Scanner

अर्जासोबत स्कॅन करुन जोडण्यात यावी उमेदवारांनी स्वतःखात्यातुनच रक्कम संबंधीत खात्यात जमा करावी. DD किंवा धनादेश मार्फत शुल्क फी स्वीकारण्यात येणार नाही.

२५)अर्जदाराने लहान कुटुंब ची प्रतिज्ञापण नमुना अ मध्ये भरुन देणे आवश्यक राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,गोंदिया

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,गोंदिया

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कटुबांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये

## प्रतिज्ञापन
### नमूना-४
(नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती/कुमारी.............................................................................................

श्री .................................... यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय .............

वर्षे, राहणार ........................ याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ............................................. या पदाकरीता माझा अर्ज दाखल केलेला अहे.

२) आज रोजी मला ............... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .......... आहे. (असल्यास जन्मतारीख नमूद करावी.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८ मार्च २००५ व त्यानंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र राहील, याची मला जाणीव आहे.

**(टिप : अविवाहित उमेदवारांना "लागू नाही" असे नमूद करुन स्वाक्षरी करावी.)**

ठिकाण : गोंदिया
दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी

Scanned with OKEN Scanner

| Sr. No | Name Of Post | Google Form Link |
|---|---|---|
| 1 | Optometrist | https://forms.gle/SheDNewz6dEyyB729 |
| 2 | Staff Nurse | https://forms.gle/TMNQPgncoMK8Z8yj8 |
| 3 | NTCP Dist. Consultant | https://forms.gle/ZwMNz1oXaucDD4248 |
| 4 | MO Dental DEIC | https://forms.gle/v1G4AhZ7VYBoRT1aA |
| 5 | Lab Technician | https://forms.gle/gn4Kop8Phf8ZCk4J6 |
| 6 | Cold Chain Technician | https://forms.gle/oNNJ3v5rRjUeShNz8 |
| 7 | Case Registry Assistant | https://forms.gle/KF6maYSpD6ZPV1qG9 |
| 8 | Audiologist | https://forms.gle/AX1QAHjBXznpzAu77 |